एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत ग्रामीण व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना विविध बाबींचा पुरवठा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एबावि-२०१५ /प्र.क्र.१६/का-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५**

**वाचा** :-१)आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३२७/२०१५, दि.१२ /०२/२०१५
२)आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३३०/२०१५, दि.१२ /०२ /२०१४
३)आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३२८/२०१५, दि.१२ /०२ /२०१४
४)आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३२५/२०१५, दि.१२ /०२ /२०१५
५)आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३२६/२०१५, दि.१२ /०२ /२०१५
६)महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का-६, दि.११/०२/२०१५

**शासन निर्णय** :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने पोषण आहाराच्या दरात वाढ केल्यामुळे शिल्लक असलेल्या निधीतून ग्रामीण व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रामधील लाभार्थ्यांना वरील संदर्भाधीन क्र.१ अन्वये आयुर्वेदिक पौष्टीक बिस्किटे, संदर्भाधीन क्र.२ अन्वये स्प्रिकंल्स, संदर्भाधीन क्र.३ अन्वये राजगिरा चिक्की, संदर्भाधीन क्र.४ अन्वये मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्की व संदर्भाधीन क्र.५ अन्वये खोबरा चिक्कीचा पुरवठा करण्याबाबतचे रु.१२०,७३,६९,१५०/- कोटी चे प्रस्ताव वरील अ.क्र.१ ते ५ येथील पत्रान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले होते. सदर प्रस्तावांपैकी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रु.८०,००,००,०००/- इतक्या कमाल रक्कमेच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच उर्वरित रक्कम ही अंगणवाडी स्तरावर वितरीत करुन त्यातून अंगणवाडीतील मुलांना अंडी/केळी आठवडयाचे वेळापत्रक तयार करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विषय | दरकरार | दरकरारा वरील दर | कमाल रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | आयुर्वेदिक बिस्किटे | शासन निर्णय क्र.एबावि-२०२०११/प्र.क्र.१८४/का-५. दि.२८/०७/२०११ अन्वये ई-निविदेव्दारे निश्चित केलेल्या दरास शासन निर्णय समक्रमांक दि.१३/०२/२०१५ अन्वये दि.३१/०३/२०१५ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीनुसार. | रु.२४.७५/- (प्रति १०० ग्रॅम) | रु.५,००,००,०००/- |
| २. | राजगिरा चिक्की | उदयोग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO)यांचे परिपत्रक क्र.उसं/भांखसं/दरनिश्चिती/ शक्तिवर्धक खाद्यपदार्थ/ व जीवनसत्व असलेली विविध खाद्यपदार्थपेये/(२४)/२०१२-२०१३/बी११५८.दि.८/०८/ २०१२ | रु.२१.५०/- (प्रति १०० ग्रॅम) | रु.२३,००,००,०००/- |
| ३. | मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्की | | रु.२८.५०/- (प्रति १०० ग्रॅम) | रु.५२,००,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अन्वये केलेली दरनिश्चिती व त्यांचे परिपत्रक क्र.उसं/भांखसं/दरनिश्चिती/शक्तिवर्धक खाद्यपदार्थ व जीवनसत्व असलेली विविध खादयपदार्थ पेये/(२९)/२०१४-२०१५/अे-११०१,दि.०१/०९/२०१४ अन्वये दि.३०/०६/२०१५ पर्यंत दिलेली मुदतवाढ. | | |
| | | एकूण | | रु.८०,००,००,०००/- |

३. **यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१) वरीलप्रमाणे आयुर्वेदिक बिस्किटांसाठी शासन निर्णय क्र.एबावि-२०२०११/प्र.क्र.१८४/का-५, दि.२८/०७/२०११ मधील अटी बंधनकारक राहतील. तसेच दि.१३/०२/२०१५ च्या शासन निर्णयानुसार एकूण खरेदी रक्कमेच्या (पुरवठा आदेशाच्या रक्कमेच्या) **५%** रक्कम सुरक्षा अनामत म्हणून रोखून ठेवावी आणि बिस्किटांमुळे लाभार्थ्यांवरील दृष्य सकारात्मक परिणामांचा अभ्यास तज्ञ संस्थेमार्फत केल्यानंतर सदर सुरक्षा अनामत रक्कम अदा करण्यात यावी.

२) वरील वस्तूंचा मागणी व पुरवठा शासन निर्णयात /दरनिश्चितीपत्रकात /दरकरारपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे केला जाईल. तसेच शासन निर्णयास/दरनिश्चितीपत्रकास /दरकरारपत्रकास मुदतवाढ देण्याबाबतच्या अटींची पूर्तता काटेकोरपणे केली जाईल, याची दक्षता आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी घ्यावी.

३) सदरचा निधी शासनाच्या विहीत धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

४) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तूंचा पुरवठा ग्रामीण /नागरी प्रकल्पस्तरापर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यानी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुसऱ्या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का-६, दि.१७/०७/२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

५) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करून करण्यात यावा. पुरवठादाराने मागणी प्रमाणे विहीत प्रमाणात, विहीत केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्पस्तरापर्यंत पुरवठा केला आहे, याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर आयसीडीएसच्या वापरासाठी/ शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांची राहील.

६) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, या दृष्टीने स्वंयस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग / मुदत बाहयतेचा दिनांक व शिल्लक याबाबतची योग्य नोंद ठेवणे इ. बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दयाव्यात.

७) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

८) " आपली अंगणवाडी " हया मासिकात सदर पुरवठयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

४. सदर खर्च " **<u>ग्रामीण प्रकल्पांसाठी</u>** :- (१) मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना (०४)(१९) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ५०% १९ आहार खर्च (२२३६१६७८) **<u>नागरी प्रकल्पांसाठी</u>** :- (१) मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना (०४) (२१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना (नागरी) केंद्र हिस्सा ५०% १९ आहार खर्च (२२३६१६९६) " या

लेखशिर्षाखालील **सन २०१४-१५** या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. याकरीता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.०९/०२/२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सी.श.डोके )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, (आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बा.क.), जिल्हा परिषदा,(आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,
सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (कार्यासन-५)